प्रकरण पहिले

सहकारी पतपुरवठा : उगम, रचना व स्वरूप

प्रकरण १ ले

प्रस्तावना

सहकारी पतपुरवठा -
उगम, रचना व स्वरूप

सहकारी संस्थेचा उगम जरी ईंग्लंडमध्ये झालेला असला तरी सहकारी पतपुरवठा संस्थांचा उगम जर्मनीमध्ये झालेला आहे. १९ व्या शतकाच्या मध्यास सहकारी पतपुरवठा संस्थांचा प्रारंभ झाला. कारण १९ व्या शतकाच्या मध्यास जर्मनीमधील शेतकरी व कारागिर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती. दुष्काळ, दारिद्रय, कर्जबाजारीपणा, आणि व्यापारी तथा सावकारांचे कडून होणारी पिळवणूक यामुळे ते गांजले होते. त्यावेळी जर्मनीतील व्यापार हा ज्यू लोकांच्या मालकीचा होता व त्याच बरोबर ते सावकारीचा व्यवसायही करीत होते. अशा परिस्थितीमध्ये हर फ्रान्स शुल्झी यांनी नागरी व हर रफायझान यानी ग्रामीण क्षेत्रासाठी योग्य सहकारी संघटन सुचविले व ते राबविले. दोघेही दूरदृष्टीचे व निष्ठावंत असे समाजसेवक होते. स्वावलंबन व परस्पर सहकार्य यामधूनच दुर्बल लोकांचा प्रश्न सुटेल अशी त्यांची भावना होती.

हर फ्रान्स शुल्झी :

हर फ्रान्स शुल्झी हे एक मेयर होते. इ.स. १८४९ मध्ये पादत्राणाअ साठी लागणारा कच्चा माल मोठया प्रमाणावर खरेदी करून तो पादत्राणे तयार करणाऱ्यांना कमी दरात उपलब्ध व्हावा यासाठी पादत्राणे बनविणाऱ्यांची सहकारी संस्था त्यांनी स्थापन केली. इ.स. १८५० मध्ये त्यांनी आपल्या राहत्या गावी पहिली पतसंस्था स्थापन केली. सभासदांना कर्ज देण्यासाठी निधी उभारणे ही या संस्थेचा हेतू होता. इ.स. १८५६ मध्ये एक पुस्तक प्रसिध्द करून त्यांनी सहकाराच्या तत्वाचा प्रसार केला. त्यानंतर इ.स. १८५९ पर्यन्त पत सहकारी संस्थाच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ

झाली. एवढेच नव्हे तर अनेक नागरी बँका स्थापन होऊन त्यांचा संघही याच काळात स्थापन झाला. इ.स. १८६७ मध्ये पहिला सहकारी कायदा जर्मनीमध्ये करण्यात आला. इ.स. १८७९ मध्ये जर्मनीतील सर्व सहकारी संस्थांना लागू करण्यात आला. या कायद्यानुसार मर्यादित दायित्वावर सर्व संस्थांची उभारणी करण्यात आली होती. थोडक्यात शुल्झे यांना स्वयंसेवा, व स्वावलंबन याला परस्पर पूरक सहकार्याची जोड मिळाल्यास दुर्बलांचा प्रश्न सुटेल असे वाटत होते आणि त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले.

हर रफायझान :

जर्मनीतील सहकारी चळवळीचा विकास करण्याचे कार्य रफायझान यांनी केले ते उल्लेखनीय आहे. रफायझान हे नगरपालिकेचे मेयर होते. दारिद्र्यात असलेल्या शेतकऱ्यांची सावकार कशी पिळवणूक करतो हे त्यांनी स्वत: पाहिले होते. दुष्काळात शेतकऱ्यांचे त्रास कमी व्हावेत, सावकाराकडून केली जाणारी पिळवणूक व शोषण थांबावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. रफायझान यांनी गरीब शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारकडून सहाय्य म्हणून धान्य घेतले. श्रीमंत लोकांनादेखील मदतीची विनंती केली. त्यांनी गरीब लोकांना अन्न देण्यासाठी ' पुअर पिपल्स कमिटी ' नेमली. इ.स.१८४९ मध्ये त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या व त्यांचा संघही स्थापन केला. या संघाने सावकाराच्या पाशात अडकलेल्या अनेक कर्जबाजारी शेतकऱ्यांना सोडविले. श्रीमंत लोकांच्या दयेवर गरीब लोकांनी राहू नये असे रफायझान यांना वाटत होते. इ.स. १८७७ मध्ये ' रफायझान युनियन ' स्थापन करण्यात आली. ही पत सहकारी संस्थांची संघ संस्था होती. या संस्थामध्ये धर्म मुल्ये व नैतिकता यावर भर दिलेला होता. स्वावलंबन, परस्पर सहकार्य, समता, संयुक्त देयता, नफ्याकडे दुर्लक्ष इ. तत्वे या संस्थामध्ये दिसून येतात.

जर्मनीमधील सहकारी संस्थांची तत्वे व कार्यपध्दतीचा आधार घेऊन जगातील इतर देशांनी सहकारी संस्था निर्माण केल्या. अशा पध्दतीने

पतपुरवठा करण्यासाठी सहकाराचा वापर जर्मनीमध्ये प्रथमच करण्यात आला. त्यामधूनच सर्व देशात सहकारी तत्वावरील पतपुरवठ्याची सुरुवात झाली.[१]

भारतामधील सहकारी पतपुरवठयाची सुरुवात :

भारतातील सहकारी चळवळीच्या उगमाच्या विकासाच्या इतिहासाचा शोध घेताना असे दिसून येते की, जगातील इतर देशाप्रमाणेच भारतातील सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्रामीण भागातील जनतेच्या दारिद्र्यातून व पिळवणूकीतून झालेला आहे.

भारतात इंग्रजांची राजवट स्थिर होत असतानाच इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे चक्र पूर्णपणे फिरले होते. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे दु:परिणाम भारतातील खेडयापाडयातून, घराघरातून चालणाऱ्या लहान-मोठया उद्योगधंद्यावर झाला. भारतातील लघु व कुटीरोद्योग इंग्लंडमधील मोठया कारखान्याशी स्पर्धा करण्यास असमर्थ ठरले. इंग्लंड-मधून कारखान्यातून भारतात येणाऱ्या मालाने भारतातील लघु व कुटीरोद्योग बंद पाडले व त्या व्यवसायातील कारागिर व कामगार बेकार झाले. उदरनिर्वाहाचे शेवटचे साधन म्हणून ते शेती व्यवसायाकडे वळले. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढली. परंतु भारतातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हालाकीची होती. अवर्षण व वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यावरील कर्जाचा बोझा वाढत गेला व शेतकरी पूर्णपणे सावकारी पाशात अडकले गेले. कारण सावकार शेतकऱ्यांना जमिनीच्या तारणावर कर्ज देत असत. कर्ज न फिटल्यास ते त्यांच्या मोबदल्यात शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊ लागले व आपल्याच शेतजमिनीवर शेतकऱ्यांना मजूर म्हणून राबावे लागे. सर डॅनियल हॅमिल्टनने या परिस्थितीचे वर्णन करताना असे म्हटले

आहे की, " ग्रामीण भागातील शेतकरी सावकाराच्या विळख्यात पूर्णपणे सापडले होते. शेतक-यांच्या दारिद्रयाला त्याचा कर्जबाजारीपणा जबाबदार आहे. अनेक शेतकरी कर्जाचे ओझे घेऊन जन्मास येत. वाढते कर्जाचे ओझे डोक्यावर वागवत जीवन कंठीत होते आणि मोठे कर्जाचे ओझे वारसावर टाकून जीवन संपवीत होते."

१८७५ च्या दरम्यान दक्षिण हिंदुस्थानात सावकारशाही विरूध्द बंड झाले. अशाप्रकारचे बंड व दंगे महाराष्ट्रात पुणे व नगर जिल्हातील शेतक-यांनी सावकाराच्या जुलमांच्या विरूध्द केले. काही ठिकाणी सावकाराचे घरे जाळण्याचा प्रयत्न झाला. सावकारांनी लिहून घेतलेल्या वचनचिठ्ठ्या अनेक शेतक-यांनी एकत्र येऊन फाडून टाकल्या. या मोहिमेचा परिणाम म्हणजे सरकारचे लक्ष शेतक-यांच्या प्रश्नाकडे वेधले गेले. सरकारने शेतक-यांना दिलासा देण्यासाठी म्हणून " डेक्कन अॅग्रिकल्चरिस्टस् रिलीफ अॅक्ट " निर्माण केला व शेतक-यांना काही प्रमाणात सूट दिली. १८८२ साली सर वेडरबर्न व न्यायमूर्ती रानडे यांनी शेतक-यांना अल्प व्याजदरात कर्जपुरवठा करून त्यांची सावकाराच्या तावडीतून मुक्तता करण्यासाठी 'शेतकी बँकेची योजना ' आखली होती. पण त्याचा फार मोठा बोझा सरकारवर पडेल असे वाटल्याने या योजना स्विकारल्या गेल्या नाहीत. परंतु या योजनेची प्रमुख तत्वे १८८३ च्या ' भूमी सुधारणा कायदा ' आणि १८८४ चा ' शेतकरी कर्ज कायदा ' असे कायदे मंजूर केले. दोन्ही कायद्याचा उद्देश म्हणजे सरकारने शेतक-यांना अल्प व्याज दराने कर्ज पुरवठा करणे हा होता. परंतु हे दोन्ही कायदे करूनही शेतक-यांची कर्जविषयक गरज पूर्ण होऊ शकली नाही. कारण हा कर्जपुरवठा करण्याचा अधिकार मुलकी अधिका-यांना देण्यात आला होता. त्यांनी शेतक-यांना वेळेवर कर्ज पुरवठा केला नाही.

निकोलसनचा अहवाल :

सहकारी संस्थाच्या उगमाबाबत अधिक निश्चितपणे पाऊल टाकण्याचे श्रेय मद्रास सरकारला द्यावयास हवे. मद्रास राज्यात भू बँका किंवा शेती बँका स्थापन करणे कितपत शक्य आहे याबाबतचा अभ्यास करण्यासाठी १८९२ साली मद्रास सरकारने फ्रेडरीज निकोलसन या अधिका-याची नेमणूक केली होती. निकोलसनने जर्मनीचा दौरा करून सहकारी चळवळीचा अभ्यास केला व त्याने आपला अहवाल १८९९ मध्ये सादर केला. निकोलसनने आपल्या अहवालात असे नमूद केले की, शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी रफायझान पध्दतीप्रमाणे कार्य करणा-या सहकारी कर्ज पुरवठा संस्था स्थापन करण्यात याव्यात. याचवेळी भारत सरकारचा एक अधिकारी श्री. ड्यूपरनेक्स याने उत्तर प्रदेशात शेती बँकाची स्थापना केली होती. त्याने आपल्या अनुभवावर आधारित एक पुस्तक देखील प्रकाशित केले होते.

सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी वर नमूद केलेले अभ्यास व प्रयोग याकडे भारत सरकारचे लक्ष वेधले गेले. १९०० मध्ये भारत सरकारने सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नेमणूक केली. या समितीने निकोलसन व ड्यूपरनेक्स या दोन्ही योजनांचा विचार करून भारतामध्ये ग्रामीण आणि नागरी भागातील दुर्बल व कर्जबाजारी व्यक्तींना कर्ज पुरवठा करण्याकरिता जर्मनीतील रफायझान पध्दतीच्या सहकारी कर्ज पुरवठा संस्था स्थापन करणे योग्य ठरेल असा निष्कर्ष काढला. १९०१ च्या दुष्काळ समितीने सुध्दा शेतक-यांची सावकाराच्या कचाटयातून सुटका करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. वरील सर्व बाबींचा विचार करून भारत सरकारने १९०४ साली पहिला सहकारी संस्था विषयक कायदा संमत केला व या कायद्यामुळेच सहकाराची मुहुर्तमेढ रोवली गेली.[२]

१९०४ च्या सहकारी
कायद्याची वैशिष्ट्ये :

१) वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० व्यक्तींना एकत्रित येऊन सहकारी संस्था निर्माण करता येईल.

२) फक्त पत पुरवठा क्षेत्रामध्येच सहकारी संस्था निर्माण करता येतील. अन्य क्षेत्रामध्ये सहकारी संस्था निर्माण करता येणार नाहीत.

३) १९०४ च्या कायद्याने सहकारी संस्थांचे ग्रामीण सहकारी संस्था व नागरी सहकारी संस्था असे वर्गीकरण केले. जर एखाद्या संस्थेतील एकूण सभासदांपैकी $\frac{४}{५}$ किंवा अधिक सभासद शेतकरी असतील तर त्या संस्थेला ग्रामीण सहकारी संस्था समजत व जर एखाद्या संस्थेतील $\frac{४}{५}$ किंवा अधिक सभासद शेतकरी नसतील तर त्या संस्थेला नागरी सहकारी संस्था समजले जाई.

४) सहकारी संस्थांनी भागाची विक्री करून भांडवल जमा करावे. कोणताही सभासद १००० रूपयांपेक्षा जास्त किंमतीचे भाग खरेदी करू शकणार नाही.

५) ग्रामीण सहकारी संस्थांची जबाबदारी अमर्यादित असेल तर नागरी सहकारी संस्थांची जबाबदारी मर्यादित असेल.

६) प्राथमिक सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र कायद्याने ठरवून दिले जाईल.

७) सहकारी संस्थांनी फक्त सभासदांनाच कर्ज द्यावे. वैयक्तिक तारणावर किंवा सभासदाची मालमत्ता तारण म्हणून घेऊन कर्ज द्यावे.

८) सहकारी संस्थांवर सरकार नियुक्त अधिकारी (नोंदणी अधिकारी) नियंत्रण ठेवील.

९) या कायद्याने सहकारी संस्थांना करार करणे, मालमत्ता धारण करणे, न्यायालयात जाऊन अन्यायाविरुध्द दाद मागणे इ. अधिकार दिले.

१०) सहकारी संस्थांची अधिक प्रगती व्हावी म्हणून त्यांना आयकर स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क इ. मध्ये सवलती दिल्या.

११) १९०४ च्या कायद्यानुसार प्रत्येक सहकारी संस्थांनी राखीव निधी निर्माण करावा. ग्रामीण सहकारी संस्थांना होणारा सर्व नफा त्यांनी राखीव निधीमध्ये जमा करावा व नागरी सहकारी संस्थांना होणाऱ्या नफ्यांपैकी $\frac{१}{४}$ नफा राखीव निधीमध्ये जमा करावा.

या कायद्यामुळे भारतात सहकारी चळवळीची सुरुवात झाली आणि सहकारी पतपुरवठा संस्थांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. पुढे १९१२ ला सुधारित सहकारी कायद्यानुसार संघ संस्था स्थापन करणेची परवानगी देण्यात आली. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकांची स्थापना करण्यात आली. १९१९ च्या सुधारणा कायद्यानंतर सहकार खाते हे राज्य सरकारकडे वर्ग करण्यात आले. त्यामुळे राज्यांनी सहकारी चळवळीची योग्य रचना केली.

राज्य पातळीवर राज्य सहकारी बँका, तसेच दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी भूविकास सहकारी बँकांचीही स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात सहकारी पतपुरवठ्याची समन्वित आणि सुसंबध्द अशी रचना करण्यात आली आहे.[३]

सेवा सहकारी संस्था :

सेवा सहकारी संस्थांना शेतकरी सेवा सहकारी संस्था किंवा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था असे सुध्दा म्हणतात.

सेवा सहकारी संस्था सध्या तरी भारतातील पतपुरवठा सहकारी संस्थांच्या रचनेत पाया ठरल्या आहेत. सेवा सहकारी संस्था प्रत्यक्ष ग्रामीण पातळीवर कार्य करीत असून त्यांचा शेतकऱ्यांशी प्रत्यक्षपणे संबंध येतो. सेवा सहकारी संस्था भारतातील ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातून सभासदांना

कर्ज पुरवठा करणे, जीवनावश्यक पुरवठा व इतर सेवा उपलब्ध करून देऊन ग्रामीण भागाचा विकास व प्रगती घडवून आणण्यास मदत करतात. या दृष्टीने सेवा सहकारी संस्थांचा अभ्यास करणे योग्य ठरेल.

सेवा सहकारी संस्था प्रारंभाचा इतिहास :

आपल्या देशात सेवा सहकारी चळवळीचा विकास प्रामुख्याने पुढील टप्प्यातून झाला आहे.

अ) पतपुरवठा सहकारी संस्था ते बहुउद्देशीय संस्था.

ब) बहुउद्देशीय संस्था ते मोठया आकाराच्या संस्था.

क) मोठया आकाराच्या संस्था ते सेवा सहकारी संस्था.

अ) पतपुरवठा सहकारी संस्था
ते बहुउद्देशीय संस्था :

१९०४ मध्ये सहकारी संस्थेसंबंधी पहिला कायदा भारतात मंजूर करण्यात आला. व या कायद्यामुळे त्यानंतरच्या काळात ग्रामीण भागातून शेतकऱ्यांना कर्ज वा पतपुरवठा करण्याकरिता अनंत लहान मोठ्या संस्था सहकारी तत्वावर स्थापन केल्या गेल्या. ग्रामीण भागातील सहकारी संस्थातील सभासदांची जबाबदारी अमर्यादित होती. ग्रामीण भागातील सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विशिष्ट खेडयापुरते मर्यादित होते. ग्रामीण भागातील सहकारी संस्था प्रामुख्याने सभासदांच्या बचती गोळा करणे, छोटया प्रमाणावर सभासदांना कर्ज देणे, एवढयाच कार्यापुरते सहकारी संस्थाचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. त्याचा परिणाम जवळजवळ १९३९ पर्यन्त भारतातील सहकारी संस्थांचा आकार छोटा होता. सभासद संख्या मर्यादित होती, त्यांचा व्यवहार छोटया प्रमाणावर होता. सभासदांची जबाबदारी अमर्यादित होती.

... KAR LIBRARY
KOLHAPUR

पतपुरवठा सहकारी संस्थांच्या कार्यात,व्याप्तीत वाढ करण्याच्या दृष्टीने व्यापक प्रयत्न १९२९ ते १९३३ च्या महामंदीनंतर सुरू झाले. १९२९-३३ च्या महामंदीचा परिणाम सहकारी संस्थावर विपरीतपणे झाला. उदा. १९३० च्या जागतिक महामंदीच्या काळात भारतातील प्राथमिक सहकारी संस्थातील थकबाकीचे प्रमाण ९२.०० टक्के पर्यन्त वाढले. त्याचा परिणाम असंख्य सहकारी संस्थांचे दिवाळे निघाले व त्या बुडाल्या. ब-याचशा सहकारी संस्था निष्क्रिय बनल्या. १९२९ ते ३३ च्या महामंदीने भारतातील ग्रामीण भागात कार्य करणा-या पतपुरवठा सहकारी संस्थांच्या रचनेत, व्यवस्थापनात, कार्यपध्दतीत असणारे दोष अधिक प्रकर्षाने दिसून आले.

१९२९-३३ च्या महामंदीने असे दाखवून दिले की, भारतातील सहकारी संस्थांनी प्रामुख्याने पतपुरवठ्यावरच आपले लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचे कार्य एकांगी राहिले होते. त्याच्या व्यवहाराचे स्वरूप मर्यादित होते परंतु असे दिसून आले की, ग्रामीण भागातील पतपुरवठा शेतक-यांच्या फक्त कर्जविषयक गरजांच पूर्ण करू शकतात. परंतु ग्रामीण भागातील इतर काही गरजा देखील तेवढयाच महत्वाच्या असतात. उदा. शेती उत्पादन विषयकच्या गरजा, शेतमालाची खरेदी-विक्री, जीवनावश्यक वस्तूंचा व शेती उत्पादनाला आवश्यक असणा-या वस्तूंचा पुरवठा (उदा. बी-बियाणे, खते इ.) या सारख्या महत्वाच्या गरजा पतपुरवठा सहकारी संस्था पूर्ण करीत नव्हत्या. त्याचा परिणाम पतपुरवठा सहकारी संस्था ग्रामीण भागात शेतक-यांच्या आर्थिक जीवनात फारसे महत्वाचे कार्य करू शकल्या नाहीत. यातूनच असा विचार पुढे आला की, ग्रामीण भागातील शेतक-यांच्या जीवनाशी संबंधित सर्व प्रश्नांना स्पर्श करू शकेल अशाप्रकारे ग्रामीण भागातील सहकारी संस्थांची रचना केली जावी. रिझर्व बँकेने १९३९ मध्ये असे मत व्यक्त केले की, ग्रामीण भागातून एकोउद्देशीय पतपुरवठा सहकारी संस्थाऐवजी बहुउद्देशीय सहकारी संस्था अधिक उपयुक्त ठरू शकते कारण बहुउद्देशीय सहकारी

संस्था ग्रामीण भागातील शेतक-यांच्या जीवनाशी संबंधित अशा सर्व बाजूंना स्पर्श करू शकते. रिझर्व बँकेने केलेल्या सूचनेप्रमाणे ग्रामीण भागातून नव्याने बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्याची आवश्यकता नाही. ग्रामीण पातळीवर कार्य करणा-या लहान आकाराच्या पतपुरवठा संस्थांचेच बहुउद्देशीय सहकारी संस्थेत रूपांतर केले जावे. बहुउद्देशीय सहकारी संस्थांनी जुन्या कर्जाची परतफेड, चांगल्या बि-बियाण्याचा पुरवठा, शेतीची सुधारित अवजारे पुरविणे, पूरक उद्योगधंदे स्थापन करण्यास सभासदांना प्रवृत्त करणे. बहुउद्देशीय सहकारी संस्थेच्या कल्पनेला १९४५ च्या सहकारी नोंदणी अधिका-याच्या परिषदेने जोरदार पुरस्कार केला. त्याचा परिणाम १९४७ नंतर ग्रामीण पातळीवर कार्य करणा-या प्राथमिक पतपुरवठा संस्थांचे बहुउद्देशीय सहकारी संस्था असे रूपांतर केले गेले. १९५७ ते ५८ पर्यन्त भारतात ७५,००० बहुउद्देशीय सहकारी संस्थांची स्थापना झालेली दिसून येत होती.

ब) बहुउद्देशीय सहकारी संस्था ते मोठया आकाराच्या संस्था :

बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या स्थापनेकडे लक्ष पुरवावे असे जरी ठरविण्यात आले तरी प्रत्यक्षात असे दिसून येते की, या बहुउद्देशीय सहकारी संस्थांनी आपल्या कार्याच्या व्याप्तीत वाढ केलेली नाही. पूर्वीप्रमाणेच त्यांचे प्रमुख कार्य पतपुरवठा राहिले व काही प्रमाणात त्यांनी वस्तूंचा पुरवठा करण्याचे कार्य हाती घेतले. अपुरे भांडवल, प्रशिक्षित व आवश्यक त्या पात्रतेच्या अनुभवी सेवक वर्गाचा अभाव, सभासदांचा अपुरा प्रतिसाद यासारख्या कारणांमुळे बहुउद्देशीय सहकारी संस्था अयशस्वी ठरल्या.

१९५४ च्या अखिल भारतीय पतपुरवठा पाहणी समितीने आपल्या अहवालात असे नमूद केले की, बहुउद्देशीय सहकारी संस्था स्वजी

मोठया आकाराच्या सहकारी संस्था स्थापन केल्या जाव्यात असे मत व्यक्त केले. या मोठया आकाराच्या संस्थांचे कार्यक्षेत्र एकाच खेडयापुरते मर्यादित न राहता काही खेडयांच्या समूहांकरिता एकच सहकारी संस्था स्थापन करणे योग्य ठरेल. अनेक खेडयांतील व्यक्ती सभासद झाल्याने संस्थेला जास्त भांडवल मिळेल. व्यवहाराची संख्या वाढत जाऊन संस्था अर्थक्षम ठरू शकेल. या दृष्टीने मोठया आकाराच्या सहकारी संस्थेची सभासद संख्या ३०० ते ५०० असावी. कर्ज व्यवहार दीड लाखापर्यन्त असावा व भांडवल २०,००० रुपयांपर्यन्त असावे असे मत अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी पुरवठा समितीने व्यक्त केले होते. मोठया आकाराच्या सहकारी संस्थेने कर्जांचा व उत्पादनाचा संबंध जोडावा व पीक कर्ज द्यावे. दुसऱ्या योजनेत १०,३७२ मोठया आकाराच्या सहकारी संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट सरकारने निश्चित केले होते.

क) मोठया आकाराच्या संस्था ते सेवा सहकारी संस्था :

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मोठया आकाराच्या सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय १९५५ ते ५८ या कालखंडात राबविण्यात आला. एम्.एल. डार्लिंग या सहकार तज्ञाने भारताला १९५७ मध्ये भेट दिली व मोठया आकाराच्या सहकारी पतपुरवठा संस्था विरुध्द त्याने आपले मत प्रतिपादन केले व लहान आकाराच्या सहकारी संस्था स्थापन करणे उपयुक्त ठरेल असे मत प्रतिपादन केले. त्यावेळचे भारताचे पंतप्रधान श्री. पंडीत नेहरु यांनी सुध्दा डार्लिंगच्या मताचा पुरस्कार केला. त्याचा परिणाम राष्ट्रीय विकास महामंडळाने असा निर्णय घेतला की, १९५८ नंतर गावभर छोटया सेवा सहकारी संस्था स्थापन केल्या जाव्यात व नंतर सेवा सहकारी संस्था निर्माण झाल्या.[४]

<u>सेवा सहकारी संस्थेची उद्दिष्टे व कार्ये</u> :

भारत सरकारच्या सामुदायिक विकास व सहकार मंत्रालयाने सेवा सहकारी संस्थेची कार्ये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जाचा पुरवठा करणे.

२) शेती उत्पादनाला आवश्यक असणाऱ्या साधनांचा पुरवठा करणे. उदा. बी-बियाणे, खते, नांगरे, किटकनाशके जंतुनाशके, पशुखाद्य इ.सभासदांना पुरविणे.

३) रॉकेल, साखर, मीठ, आगपेटी यासारख्या जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे.

४) शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या खरेदी-विक्रीची नोंद करणे. त्यांच्या मालाच्या साठयाची व्यवस्था करणे.

५) ग्रामीण भागातून बियाणे, कंपोस्ट खते याचे शक्य तेवढे उत्पादन करण्याचा प्रयत्न करणे.

६) खेड्यांच्या शेती विकासाचा कार्यक्रम ठरविणे, शेतीसाठी लागणाऱ्या अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जाचा अंदाज करणे व त्याप्रमाणे शेती विकासाच्या व शेतीला कर्ज पुरवठयांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

७) मोठी शेतीची अवजारे भाडयाने देणे

८) सभासदांना दिलेल्या कर्जाच्या वापरावर देखरेख ठेवणे. कर्जाची वसुली करणे.

९) सभासदांना सहकाराचे शिक्षण देणे, सामान्य कल्याणकारी कार्ये हाती घेणे, त्यांच्याकडून ठेवी गोळा करणे व त्यांना शेतीसंबंधी प्रश्नाबाबत मार्गदर्शन करणे.[५]

सेवा सहकारी संस्था व पीक कर्ज योजना :

सहकारी संस्था अल्प मुदतीचे कर्ज देत असतात. अल्प मुदतीच्या कर्जाची मुदत एक वर्षाची असते. सहकारी संस्था शेतक-यांना जे अल्प मुदतीचे कर्ज देतात त्या कर्जाच्या उद्देशाप्रमाणे अल्प मुदतीच्या कर्जाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१. उपभोग कर्ज

२. इतर कर्जे

३. पीक कर्ज.

पीक कर्ज योजना :

शेती हा सुध्दा एक व्यवसाय आहे. इतर व्यवसायाप्रमाणे शेतीलासुध्दा कर्जाची आवश्यकता असते. भारतातील शेतक-याला शेती करण्यासाठी चांगल्या प्रतीच्या बि-बियाणांची खरेदी, शेत जमिनीची नांगरट, रासायनिक व इतर खते, पीक रक्षणासाठी जंतुनाशके, किटक-नाशके, रसायने, पीकांची कापणी व इतर हंगामी खर्चाकरिता कर्ज आवश्यक असते. परंतु भारतातील शेतकरी गरीब असल्याने व वरील प्रकारचा खर्च करण्याइतपत पैसा त्याच्याजवळ नसल्याने ते जमिनीतून वा शेतीतून पुरेसे उत्पादन करू शकले नाहीत. या कारणासाठी भारतातील शेती व्यवसाय तोटयात येत होता. पीक होण्यासाठी आवश्यक तो पैसा पुरवावा व त्याद्वारे शेती व शेतक-यांचे उत्पन्न वाढावे या हेतूने पीक कर्ज योजना व पध्दती सुचविण्यात आली.

पीक कर्ज पध्दतीमध्ये शेतक-याला पीक घेण्याकरिता कर्ज दिले जाते. म्हणजे कर्जाच्या व शेतीतील उत्पादनाचा प्रत्यक्षपणे संबंध जोडला जातो. पीक कर्ज पध्दतीत शेतक-याला विशिष्ट प्रकारचे पीक घेण्याकरिता किंवा पीक लागवड करण्याकरिता कर्ज दिले जाते. शेतक-यांना नवीन पीक घेण्याकरिता त्याला नवीन उत्पादन घेऊ पाहणा-या पिकांच्या

तारणावर कर्ज दिले जावे अशी सूचना अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने १९५४ मध्ये केली होती. रिझर्व बँकेने देखील ` पीक कर्ज योजना ` स्विकारली जावी अशी सूचना राज्य सरकारला केलेली असल्याने ती योजना अनेक राज्य सरकारांनी स्विकारली आहे व त्या योजनेमार्फत शेतक-यांना शेतीचे पीक घेण्याकरिता अल्प मुदतीचे कर्ज दिले जाते. अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने असेही सुचविले होते की, सहकारी संस्थांनी उत्पादनाला उपयुक्त ठरेल असे धोरण व कार्यपध्दती स्विकारावी, त्याचबरोबर संस्थांनी दिलेल्या कर्जाच्या वापरावर देखरेख ठेवणे, त्याच्या परतफेडीवर नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे म्हणून शेतीच्या पीक हंगामाबरोबर कर्ज परतफेडीचा संबंध जोडता येईल. अशी पीक कर्ज पध्दती अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने सुचविली होती. पीक कर्ज पध्दतीत शेतक-यांना शेती उत्पादन कार्यासाठी संभाव्य पीकाच्या तारणावर कर्ज देण्याची योजना आखण्यात आली होती. पीक कर्ज योजनेत शेतक-यांच्या पिकांची योजना वा उत्पादन प्रमाण विचारात घेऊन त्याला आवश्यकती रक्कम कर्ज रूपाने उपलब्ध करून दिली जाते. पीक कर्जाची रक्कम वस्तूच्या स्वरूपात दिली जाते. शेतीच्या उत्पादनात त्याचा वापर करो अथवा न करो किंवा जमीन त्याच्या मालकीची असो वा नसो, त्याला त्याच्या संभाव्य पीकाच्या तारणावर कर्ज दिले जाते. शेतक-याच्या पिकातून कर्जाचा परतफेड करता येणे शक्य होते. पीक कर्ज पध्दतीत कर्जाची रक्कम, घेतले जाणारे पीक, त्याचे प्रमाण व प्रकार व त्याला येणारा खर्च विचारात घेऊन ठरविले जाते. पीक कर्ज पध्दत मुख्यत: पीक उत्पादन क्षमता आणि पीकांच्या विक्रीपासून मिळणारी रक्कम या घटकावर आधारित आहे.

पीक कर्ज पध्दतीप्रमाणे कर्ज मिळविण्याकरिता शेतक-याकडून इतर कोणत्याही प्रकारचे तारण घेतले जात नाही.

पीक कर्ज पध्दतीची वैशिष्ट्ये :

१) पीक कर्जाचा उद्देश मुख्यत: शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे हा आहे .

२) पीक कर्ज मुख्यत: संभाव्य पिकांच्या तारणावर दिले जाते.

३) पीक कर्ज योजनेत पीक उत्पादनाला जेवढा खर्च येतो त्या खर्चाच्या प्रमाणात कर्जाची रक्कम दिली जाते.

४) पिकाच्या विक्रीतून परस्पर कर्जफेड करून घेतली जाते.

५) कर्जाच्या रक्कमेचा काही भाग रोख स्वरूपात व काही भाग वस्तूंच्या स्वरूपात दिला जातो. उदा. बि-बियाणे, खते, किटकनाशके औषधे इत्यादी.

पीक कर्ज पध्दती राबविण्याची पध्दती :

पीक कर्ज पध्दती पुढील पध्दतीने राबविली जाते -

१. कर्जाचे अंदाजपत्रक -

सर्वसाधारणपणे प्रत्येक सहकारी संस्थेला कायद्यातील तरतुदीप्रमाणे ३० सप्टेंबर पूर्वी सभासदांची सभा घ्यावी लागते. या सभेत मागील वर्षाचे हिशोब व व्यवहारावर चर्चा केली जाते. त्याचप्रमाणे पुढील वर्षी करावयाच्या कामांचा अंदाज आखलेला असतो. पुढील वर्षाच्या कामाच्या अंदाजात मुख्यत: सभासदांना पीक कर्ज योजनेअंतर्गत किती कर्ज दिले जावे हे ठरविले जाते. म्हणून प्रत्येक सभासदाने सभेच्या पूर्वी आपल्या पुढच्या वर्षाच्या कर्जविषयक गरजा संस्थेस कळवाव्या लागतात. मात्र त्यात मुख्यत: आपली जमीन व आपण कोणते पीक घेणार त्याचा तपशील हा भाग महत्वाचा ठरतो. तो कोणते कर्ज किती प्रमाणात घेणार आहे त्यावरून बि-बियाणांचा खर्च, खताचा खर्च, शेतमजुराची मजुरी इ. ठरत असते.

२. पीक कर्ज रकमेचा अंदाज करणे -

शेतक-यांना आवश्यक असणा-या पीक कर्ज रकमेचा अंदाज करण्याकरिता कर्ज रकमेचा अंदाज पुढील वर्गीकरणातून केला जातो.

घटक ` अ ` - परंपरागत पध्दतीने शेतीची कामे करण्याकरिता येणारा खर्च या पध्दतीत खतावरील खर्च सोडून कमी असतो. या फक्त काम प्रमाणे येणा-या खर्चाच्या $\frac{1}{3}$ रक्कम सभासदाला कर्ज रूपाने दिली जाते.

घटक ` ब ` - शेतक-यास शेतीसाठी आवश्यक असणारी बी-बियाणे, रासायनिक व इतर खते, किटकनाशके, इत्यादी बाबींवर शेतक-यांचा होणारा खर्च शक्यतो वस्तूंच्या स्वरूपात दिला जातो.

घटक ` क ` - खते, किटकनाशके, यांचा वापर करण्याकरिता येणारा खर्च शक्यतो वस्तूच्या किंमतीच्या निम्म्यापेक्षा जास्त असू नये.

घटक ` ड ` - जर सभासदांनी आपल्या मालाची विक्री सहकारी संस्थेमार्फत केली तर त्यांना जादा काही रक्कम रोख स्वरूपात काही राज्यातून सहकारी संस्था सभासदांना देतात.

१९६९ च्या अखिल भारतीय पुर्नपतपाहणी समितीने असे स्पष्ट केले आहे की, पीक कर्ज देताना घटक ` अ ` रोख स्वरूपात व घटक ` ब ` वस्तू स्वरूपात द्यावा.

३. जिल्हा शेतकरी अधिकारी -

जिल्हा शेतकी अधिकारी मध्यवर्ती बँकेला सरासरी प्रति एकरी शेती खर्चाची अंदाजे रक्कम कळवितो. शेतकी अधिकारी . खर्चाची रक्कम विविध पिकासाठी व विविध घटकाप्रमाणे (अ, ब, क व ड) किती येईल याचा अंदाज काढतो.

४. सहकारी कार्यकर्त्यांची परिषद -

पीक कर्ज पध्दतीप्रमाणे प्रत्येक प्रकारच्या पिकाकरिता शेतकी अधिका-याने केलेल्या खर्चाच्या अंदाजाचा विचार करून किती प्रमाणात कर्ज दिले जावे याचे प्रमाण दरवर्षी भरणा-या सहकारी कार्यकर्त्यांच्या परिषदेमध्ये ठरविले जाते. सहकारी कार्यकर्त्यांच्या परिषदेमध्ये या जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थेचे प्रतिनिधी, जिल्हा मध्यवर्ती बँक, सहकारी खाते, शेती खाते व इतर अनेक कार्यकर्ते भाग घेतात. या परिषदेतील कार्यकर्त्यांच्या चर्चेच्या व निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा मध्यवर्ती बँक आपले कर्जाचे धोरण निश्चित करीत असते. सर्वसाधारणपणे सहकारी कार्यकर्त्यांची परिषद हंगामापूर्वी मध्यवर्ती बँकेच्या सल्ल्याने आक्टोबरमध्ये घेतली जाते.

पीक कर्ज पध्दती :

पीक कर्ज पध्दतीमध्ये सभासदाला पिकांच्या तारणावरच कर्ज दिले जाते परंतु प्रत्येक सभासदाचा सहकारी कायद्याप्रमाणे करार लिहून घेतला जातो. त्यामध्ये सभासदाची जमीन, चौत्रफळ, ठिकाण, आकार, किंमत, इतरांचा बोजा इत्यादी तपशील असतो. यास इकरार म्हणतात. त्यामुळे सहकारी संस्थेचा अशा जमिनीवर हक्क निर्माण होतो. इकरारात नमूद जमीन जोपर्यन्त संस्थेचे कर्ज, व्याज असेपर्यन्त विकता येत नाही. किंवा अन्य बोजा निर्माण करता येत नाही.

कमाल मर्यादा पत्रक :

कमाल कर्ज मर्यादा पत्रक म्हणजे पीक कर्ज योजनेखाली शेतक-यांना संपूर्ण वर्षात लागणा-या कर्जाचा तपशील सहकारी संस्थेला हंगामापूर्वीच द्यावा लागतो. अशी माहिती ज्या पत्रकात जमा केली जाते ते पत्रक म्हणजे कमाल मर्यादा पत्रक होय. या पत्रकात सभासदाचे नाव, गेल्या

हंगामातील पीक, त्यासाठीचे कर्ज, परतफेड, थकबाकी, पुढील हंगामात घेतले जाणारे पीक आवश्यक कर्ज इत्यादी माहिती असते. सर्व सभासदांचे एकत्रित कमाल मर्यादा पत्रक तयार केले जाते. संस्था हे पत्रक देखरेख मंडळाकडे व त्यांचे तपासणीनंतर जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे पाठविते. नंतर चौकशी, छाननी करून अंतिम मंजुरीकरिता बँकेच्या संचालक मंडळापुढे येते. कर्ज धोरणाप्रमाणे विविध पीकासाठीचे कर्ज मंजूर केले जाते. कमाल मर्यादा पत्रकाद्वारे शेतकऱ्यांची कर्जाची गरज समजते आणि कर्ज रक्कम कोणत्या स्वरूपात किती दिली जाणार आहे हे समजते.

<u>कर्ज वाटप पध्दती</u> :

संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांना दिले जाणारे कर्ज तीन भागात दिले जाते. जमिनीच्या पेरणी-लागवडीपूर्व मशागतीसाठी पीक कर्जाचा पहिला भाग रोख स्वरूपात दिला जातो. दुसरा भाग बियाणे, रासायनिक खते, अशा वस्तु स्वरूपात दिला जातो. आणि काही काळाने खतांचा वापर पिकांची निगा इ. कार्यासाठी तिसरा भाग रोख स्वरूपात दिला जातो.

<u>कर्ज वसूली</u> :

दिलेल्या पीक कर्जाची वसुली शेतीच्या उत्पादनातूनच केली जावी अशी अपेक्षा असते. यासाठी सभासदाने आपल्या पीकाची विक्री सहकारी संस्थेमार्फत करावी असा आग्रह धरला जातो. जर सभासदांच्या पिकाची विक्री सहकारी संस्थेमार्फत करता आली तर विक्री रकमेतून कर्जाची परतफेड संस्था परस्पर करून घेऊ शकते व राहिलेली रक्कम सभासदांना देते. पीक कर्ज योजना यशस्वी होण्यासाठी कर्ज पुरवठा व सहकारी खरेदी विक्री कार्यात लक्ष घालणे आवश्यक आहे.[६]

सहकारी पतपुरवठा : उद्दिष्टे

सहकारी पतपुरवठयाची गरज किंवा आवश्यकता :

सहकारी संस्थांचे कडून दिला जाणारा पतपुरवठा हा सर्वसाधारणपणे असंघटित व्यवसायासाठी दिला जात असे. उदा. असंघटित असा शेती व्यवसाय, लघुउद्योगधंदे, ग्राहक व्यवसाय, शेतमालाची विक्री करणा-या सहकारी संस्था, प्रक्रिया संस्था आणि धरणबांधणी यासाठी सहकारी पतपुरवठा केला जातो. यामुळे व्यापारी बँका किंवा मोठे मोठे उद्योगधंदे यांचे संदर्भात तुलनात्मक विचार केला असता सहकारी पतरचनेतील सहकारी बँका, पतसंस्था, यांचे कार्य एकसारखे दिसले तरी उद्दिष्टये, धोरणे, कार्यपध्दती, कार्यक्षेत्राची मर्यादा, नोकर वर्ग आणि उत्पन्न व खर्चाचे प्रमाण या प्रमुख बाबींमध्ये फरक दिसून येतो. सहकारी संस्थेत नफ्यापेक्षा सेवाभावावर जास्त भर दिला जातो. व्यापारी बँकापेक्षा सहकारी संस्थेमध्ये उदारतेचे धोरण असते कारण सहकारी पतपुरवठा हा समाजातील दुर्बल वर्गासाठी असतो. सहकारी संस्थामध्ये व्यापारी बँका सारखी तारणाबाबतची भूमिकाही ताठर नसते. सहकारी पतपुरवठा संस्थामध्ये खर्चांचे प्रमाण कमीतकमी ठेवले जाणे आवश्यक असते. त्यामुळे कमीतकमी व्याज दरात सभासदांना कर्जपुरवठा करता येतो. तारणाबाबतही भूमिका उदार ठेवणे महत्वाचे असते त्यामुळे दुर्बल सभासदांना कर्जपुरवठा करणे शक्य होते. ठेवी जमा करून बचतीच्या सवयी निर्माण करणे व या ठेवीमधून संस्थेचे भांडवल वाढविणे, दिलेल्या पतपुरवठयाचा योग्य वापर व्हावा यासाठी त्या कर्जाच्या विनियोगावर देखरेख करणे तसेच आवश्यक ते मार्गदर्शन करणे इ. उद्देश सहकारी पतपुरवठयामागे आहेत.

प्रा. होरेस बेलशा या तज्ञाच्या मतानुसार सहकारी पतपुरवठयाची उद्दिष्टये पुढील प्रकारची आहेत :

१) सहकारी संस्थेतील निधीची उभारणी करण्यासाठी बचतीचे संवर्धन करणे.

२) दिलेल्या पतपुरवठयाचा चांगला वापर होण्यासाठी देखरेख व मार्गदर्शन करणे, त्यामुळे पतपुरवठयाच्या गैरवापराची शक्यता टाळणे.

३) सहकारी संस्थेचा व्यवस्थापकीय खर्च किमान ठेऊन घावयाचा व्याज दर कमी ठेवण्याचा प्रयत्न करणे.

४) वरील खर्चाचा परिणाम म्हणून सहकारी पतसंस्थेची पत वाढविणे व इतर मार्गांनी सहज भांडवल उभारण्याची शक्यता वाढविणे.

५) तारणाबाबत उदार दृष्टिकोन ठेवूनही कर्ज बुडीताची शक्यता कमी करणे.

सहकारी पतपुरवठा हा ग्रामीण भागामध्ये बहुतांशी शेतीसाठीच दिला जातो. शेतीमधून निघणारे उत्पादन कमी, उत्पादनाचा खर्च मात्र जास्त उत्पन्न कमी म्हणून शेतकरी संस्थेच्या मदतीने, एकमेकांच्या सहकार्याने त्याचा विकास करणे हेच सहकारी पतपुरवठयाचे अत्यंत महत्वाचे उद्दिष्ट आहे.

सहकारी पतपुरवठयाचे वर्गिकरण :

सहकारी संस्था जे कर्ज देतात त्यांचे खालील प्रमाणे वर्गिकरण केलेले आहे.

सहकारी पतपुरवठा वर्गिकरण

- कालावधीनुसार
  - अल्प-मुदत कर्ज
  - मध्यम मुदत कर्ज
  - दीर्घ मुदत कर्ज
- कर्ज हेतूनुसार
  - शेती-साठी कर्ज पुरवठा
  - बिगर शेती कर्ज पुरवठा
  - कौटुंबिक खर्चा-करिता कर्ज पुरवठा
- तारणानुसार
  - वैयक्तिक तारण
  - तारण-गहाण

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अ) कर्ज कालावधीनुसार पतपुरवठा :

सहकारी संस्था कर्जाच्या कालावधीनुसार तीन प्रकारचा कर्ज पुरवठा करतात.

१. अल्प मुदत कर्ज पुरवठा -

अल्प मुदतीच्या कर्जाच्या कालावधी १ वर्षांचा असतो. अपवादात्मक स्थितीमध्ये हा कालावधी १५ महिनेपर्यन्त असतो. हे कर्ज प्रामुख्याने ` पीक कर्ज ` म्हणून ओळखले जाते. अशा कर्जाचा उद्देश प्रामुख्याने शेतीमधील पीक चांगल्या प्रकारे घेता यावे व त्यापासून चांगले उत्पन्न मिळावे हा असतो. शेत जमिनीची दैनंदिन कामे पार पाडणे, खते, बि-बियाणे, जंतुनाशके, तृणनाशके खरेदी करण्यासाठी हे कर्ज दिले जाते. प्रारंभी हे कर्ज जमिनीच्या तारणावर दिले जात असे. १९६० मध्ये मेहता कमिटीने ` पीक कर्ज ` हे वैयक्तिक तारणावर आणि ज्या पिकासाठी कर्ज द्यावयाचे आहे त्या संभाव्य पीकावर करारानुसार प्रभार निर्माण करून द्यावे अशी शिफारस केली. त्यामुळे जमिनीवर कष्ट करणा-या कुळांनाही असे कर्ज मिळू लागले. पूर्वी फक्त हे कर्ज जमीन मालकालाच मिळत होते.

२. मध्यम मुदत कर्ज -

या प्रकारच्या कर्जाचा कालावधी ५ वर्षे पर्यन्त असतो. नवीन जमीन लागवडीखाली आणणे, जमिनीचे सपाटीकरण करणे, बांधबंदिस्ती करणे, मोटार पंप व ऑईल ईंजिन खरेदी करणे, पाईपलाईन, शेती उपयुक्त जनावरे (बैल, म्हैशी) खरेदी करणे, शेती अवजारे खरेदी करणे, साखर कारखान्यांचे शेअर्स खरेदी करणे इ. साठी दिले जाते. ही रक्कम अल्प मुदतीच्या कर्जापेक्षा जास्त असते त्यामुळे कर्ज परतफेडीसाठी मुदतसुध्दा जास्त असते.

३) दीर्घ मुदत कर्ज -

या कर्जाचा कालावधी २० वर्षांपर्यन्त असतो. प्रामुख्याने शेती-मध्ये कायम स्वरूपी शेती सुधारणा करणे, शेती उपयुक्त यंत्रसामग्री खरेदी करणे, पाणी पुरवठयाच्या मोठया योजना कार्यान्वित करणे, जमीन खरेदी करणे, नवीन विहिर खोदणे इ. कारणासाठी दिले जाते. पूर्वी जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी दीर्घ मुदत कर्ज दिले जात असे परंतु सध्या त्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे. अलिकडे शेतीस उपयुक्त असे जोड उद्योग सुरू करण्यासाठी दीर्घ मुदत कर्ज दिले जाते. अल्प मुदत व मध्यम मुदत कर्जापेक्षा या कर्जाची रक्कम मोठी असल्यामुळे कर्ज परतफेडीचा कालावधीसुध्दा जास्त असतो.

ब) कर्जाच्या हेतूनुसार कर्जाचे वर्गीकरण :

१. शेतीकरिता कर्ज पुरवठा -

शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते खरेदी करण्याकरिता, मजुराचे वेतन देण्याकरिता, कृत्रिम पाणीपुरवठा उपलब्ध करून घेण्याकरिता, शेतकऱ्यांना कर्ज दिले जाते. तसेच शेतकऱ्यांना जनावरांच्या खरेदीसाठी, विहिर खोदण्यासाठी कर्ज दिले जाते. थोडक्यात शेती व्यवसायासाठी हे कर्ज दिले जाते.

२. बिगर शेती कर्ज पुरवठा -

हे कर्ज शेतकऱ्यांना अवजारांची दुरुस्ती करण्यासाठी, वहातुक खर्च भागविण्यासाठी व इतर बिगर शेती कारणासाठी दिले जाते. अशा कर्जाचा प्रत्यक्ष शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी उपयोग होत नसला तरी शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी त्याचा अप्रत्यक्षपणे उपयोग होत असतो.

३. कौटुंबिक खर्चांकरिता कर्ज पुरवठा -

या प्रकारचे कर्ज प्रामुख्याने कपडयालत्याची खरेदी, औषधे, मुलांचे शिक्षण इ. कौटुंबिक खर्चासाठी दिले जाते. घरे बांधण्यासाठी, दुष्काळात तरतूद करून ठेवण्यासाठी, घरातील विवाहादी प्रसंग साजरे करण्यासाठी हे कर्ज दिले जाते.

क) तारणावरून केले जाणारे वर्गीकरण -

१. वैयक्तिक तारण -

या कर्ज प्रकारामध्ये शेतक-याच्या वैयक्तिक पतेवर कर्ज पुरवठा केला जातो. शेतक-याचे समाजातील स्थान, चारित्र्य, कर्जफेडीची कुवत या गोष्टी या ठिकाणी महत्वाच्या असतात. अशा कर्जास तारण नसल्यामुळे व्याजाचा दर जास्त असू शकतो.

२. तारण गहाण -

शेतक-याचे पीक हे कर्ज पुरवठयासाठी तारण म्हणून स्विकारले जाते. पिकाची विक्री झाल्यानंतर शेतक-याकडून कर्जाची परतफेड केली जाते. पिकाव्यतिरिक्त शेतक-याचे घर, त्याच्या जवळील सोने व सोन्या-चांदीचे दागिने,जमीन, अवजारे, यंत्रसामग्री याचाही उपयोग तारण म्हणून केला जातो.

सहकारी कर्जपुरवठयाची रचना :

भारतामध्ये सहकारी कर्ज पुरवठयाची रचना ही त्रिस्तरीय व द्विस्तरीय आहे. तसेच संघीय स्वरूपाची आहे. या रचनेमधून फक्त शेतकरी किंवा ग्रामीण पतसंस्था पातळीवरच नव्हे तर विविध पातळीवर (जिल्हा व राज्य) कर्ज पुरवठा करणा-या अनेक संस्था - बँकात समन्वय रहावा अशा प्रकारची अपेक्षा आहे. निश्चित प्रकारचे आधुनिक धोरण (एकसूत्री-पणे सगळीकडे अंमलात आणण्यासाठी पतपुरवठा संस्थातील समन्वायची गरज आहे. एकूण पतपुरवठाही त्यामुळे सुरक्षित राहू शकतो. त्यासाठी

ही रचना योग्य आहे. पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थामध्ये कार्याच्या व व्यवस्थापनाच्या सोयीनुसार दोन गट किंवा भाग पाडलेले आहेत :

अ) अल्प व मध्यम मुदती कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था व बँका.

ब) दीर्घ मुदती कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी बँका.

<u>शेती सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना</u>[8]



भारतामध्ये सहकारी पतपुरवठयामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व सहकारी पतसंस्था व बँका यांचे विविध पातळीवरील संख्यात्मक स्वरूप पाहता ही सहकारी पतपुरवठ्याची रचना त्रिशंकूसारखी दिसून येते. कारण प्राथमिक किंवा ग्रामीण स्तरावर सहकारी पतसंस्थांची संख्या खूप मोठी आहे. त्यानंतर जिल्हा पातळीवर कार्य करणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या राज्य सहकारी

बँका. या बँकाना शिखर बँक असेही म्हणतात. अशा पध्दतीने ही रचना आहे.[१]



<u>अल्प व मध्यम मुदत कर्ज पुरवठा रचना</u> :

प्राथमिक सहकारी पतसंस्था या ग्रामीण पातळीवर स्थापन केल्या जातात. त्यांनी मिळून जिल्हा पातळीवर मध्यवर्ती संघ संस्था म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन केलेली आहे. सर्व प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासदत्व स्विकारतात. तर सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी मिळून राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक ही संघ संस्था स्थापन केलेली असून सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्य सहकारी बँकेचे सभासदत्व स्विकारतात. राज्य सहकारी बँका अल्प व मध्य मुदती पतपुरवठा करणाऱ्या रचनेमध्ये सर्वोच्च ठिकाणी असतात.

दीर्घ मुदत कर्ज पुरवठा रचना :

दीर्घ मुदत कर्ज पुरवठयाचे बाबतीत काही राज्यात द्विस्तरीय तर काही राज्यात त्रिस्तरीय अशा स्वरूपाची रचना आहे. द्विस्तरीय रचनेत राज्य पातळीवर कार्य करणारी राज्य सहकारी भूविकास बँक किंवा मध्यवर्ती भूविकास बँक असते व जिल्हा पातळीवर प्राथमिक सहकारी भूविकास बँका असतात व या बँका आपल्या शाखा, तालुका व ग्रामीण पातळीवर उघडतात. अशा शाखांमार्फत दीर्घ मुदत कर्ज पुरवठा केला जातो.

अशाप्रकारे भारतातील सहकारी कर्ज पुरवठयाची ही रचना अत्यंत योग्य, समन्वित व महत्वाची अशी आहे.

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे नेतृत्वाखाली नेमलेल्या नॅशनल क्रेडिट कौन्सिलच्या अहवालात म्हटले आहे की, " सहकारी बँक पध्दती ही समन्वित असून ती आपल्या त्रिस्तरीय रचनेद्वारा शेतकरी, कारागीर व सामान्य लोकांना पतपुरवठा करीत आहे. या त्रिस्तरीय रचनेमुळेच या सहकारी संस्थांना शहरी विभागातील साधनसंपत्तीचा ओघ ग्रामीण विभागाकडे वळविणे शक्य झाले आहे व हे कार्य या रचनेद्वारा अल्पखर्चात पार पाडले जाते.[१०]

सहकारी पतपुरवठा रचनेमध्ये विविध पातळीवर
कार्य करणा-या सहकारी संस्था किंवा बँका :

१) प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था -

प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था म्हणजे भारतातील सहकारी चळवळीचा गावपातळीवरील महत्वाचा व पायाभूत आधार आहे. प्रत्यक्ष शेतक-याचा या संस्थाशी संबंध येतो. शेतक-यांनीच एकत्र येऊन त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी या संस्था स्थापन केलेल्या असतात. भारतातील एकूण सहकारी संस्थामध्ये प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थांचा वाटा

६० ते ६५ टक्के इतका आहे. त्यामुळे भारतीय सहकारी चळवळीचे यशापयश या संस्थेच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून असते. प्राथमिक सहकारी पतसंस्था आपले भांडवल सभासदांमध्ये भाग विक्री करून मिळविती. तसेच सभासद आपल्या बचती या संस्थेकडे ठेवतात. सभासदांची कर्जाची गरज या संस्था भागवितात परंतु त्यांचेकडे कमी भांडवल असते. म्हणून या संस्था जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेतात व त्यामधून सभासदांना कर्ज पुरवठा करतात. या कारणासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेस सर्व प्राथमिक सहकारी पतसंस्था जोडलेल्या असतात.

२) <u>जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका</u> -

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे त्रिस्तरीय पतपुरवठा रचनेनुसार समतोल साधणारा मध्यवर्ती घटक होय. या बँका आपल्या जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना कर्ज पुरवठा करीत असतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका हा प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांच्या संघ संस्था आहेत. जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्था व व्यक्तीसुध्दा सभासद असतात.

जिल्हा मध्यवर्ती बँकेची कार्ये पुढीलप्रमाणे असतात.

१) प्राथमिक सहकारी पतसंस्थांची कार्यक्षमता व अर्थक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने त्यांच्यावरती देखरेख ठेवणे.

२) प्राथमिक सहकारी पतसंस्थांना त्यांच्या गरजेनुसार कर्ज पुरवठा करणे.

३) ग्रामीण भागात व्यापारी बँकाप्रमाणे बँकिंगची सर्व कार्ये करणे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी राज्य सहकारी बँकेचे सभासदत्व स्विकारलेले असते व गरजेनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्य सहकारी बँकेकडून कर्ज घेतात व त्यामधून प्राथमिक सहकारी पतसंस्थांना कर्ज

पुरवठा केला जातो. सहकारी व रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या पतपुरवठा धोरणानुसार शेतीकरिता मिळणारा कर्ज पुरवठा राज्य सहकारी बँकेकडून या बँका स्विकारतात. जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या विकासाची जबाबदारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची असते.

३) राज्य सहकारी बँक (शिखर बँक) -

सहकारी पतपुरवठा यंत्रणेमध्ये राज्य सहकारी बँक ही सर्वोच्च ठिकाणी असते. त्यामुळे या बँकेस शिखर बँक असे म्हणतात. सहकारी पतपुरवठयामध्ये ही बँक समतोल निर्माण करते. ग्रामीण भागातील भांडवलाची मागणी व पुरवठा यामध्ये संतुलन साध्य करण्याचे महत्वाचे कार्य या बँका करतात. सहकारी संस्थांना आवश्यक असणारे भांडवल कमी व्याज दराने मिळवून त्यांच्या वाटपाचे कार्य या बँका करतात. व राज्यातील सहकारी चळवळ आर्थिकदृष्टया सुदृढ बनवितात, राज्य सहकारी बँकेच्या सभासद त्या राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँका असतात. तसेच इतर प्रकारच्या सहकारी संस्थाही सभासद असतात. त्यांचे भाग भांडवल व जमविलेल्या ठेवी यामधून राज्य सहकारी बँकांची भांडवल उभारणी होते. अल्प मुदतीचे पीक कर्ज, शेतमालाची विक्री, प्रक्रिया, शेती सुधारणा, दुग्ध व्यवसाय, इत्यादीसाठी जिल्हा मध्यवर्ती बँकांना कर्ज पुरवठा करता यावा यासाठी राज्य सहकारी बँका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्ज पुरवठा करतात. राज्य सहकारी बँका शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्ज पुरवठा करीत नाहीत पण अप्रत्यक्षरीत्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत कर्ज पुरवठा करतात. राज्यातील संपूर्ण सहकारी चळवळीवर नियंत्रण ठेवणे व त्यांना सर्वांगीण मदत करणे, नेतृत्व करणे, विकास घडवून आणणे इत्यादी कामे या बँकेस करावी लागतात.[१०]

भारतातील सहकारी पतपुरवठयाचे धोरण
व त्यांचे बदलते स्वरूप :

रिझर्व बँक ऑफ इंडियाची सहकारी
पतपुरठयामधील भूमिका :

रिझर्व बँक ऑफ इंडिया ही भारताची मध्यवर्ती बँक आहे. देशाच्या मध्यवर्ती बँकेचे कार्य करीत असतानाच सहकार चळवळीस उत्तेजन देणे, मार्गदर्शन व सहकार्य करण्याचे कार्य रिझर्व बँक ऑफ इंडिया करीत आहे. तसेच सहकाराची गुणवत्ता व कामकाजात सुधारणा व्हावी यादृष्टीने आणि शेती क्षेत्राला लागणाऱ्या पतपुरवठयाचा ओघ सतत योग्य प्रकारे रहावा यासाठी रिझर्व बँकेने अनेक महत्वाचे उपाय योजले आहेत. त्यातूनच बहुउद्देशीय सहकारी संस्था, प्रादेशिक व ग्रामीण बँका आणि नाबार्ड यांची स्थापना झाली आहे. रिझर्व बँक सहकारी चळवळीस खालील मार्गांनी वित्तीय सुविधाही पुरविते.[११]

१. अल्प मुदत पतपुरवठयाची तरतूद -

रिझर्व बँक राज्य सहकारी बँकांना सवलतीच्या दराने पात्र हुंडयाच्या तारणावर रिझर्व बँका कायद्याच्या सेक्शन १७(२) अ, ब आणि १७ (४) खाली कर्जाच्या सुविधा पुरविते. तसेच सहकारी हमीचे आधारे सुध्दा सेक्शन १७(४) खाली अॅडव्हान्स पुरविते.

सेक्शन १७(२)(अ) नुसार ९० दिवसांमध्ये मॅच्युअर होणाऱ्या व्यापारी व्यवहारातील प्रॉमिसरी नोटस् आणि हुंडया यावरही सवलतीच्या दराने रिझर्व बँक ऑफ इंडिया राज्य सहकारी बँकांना कर्ज पुरवठा करते. सेक्शन १७(२)(ब) नुसार १५ महिनेपर्यंन्त मॅच्युअर होणाऱ्या हुंडया व प्रॉमिसरी नोटस् यांचे आधारे शेतीची हंगामी कामे किंवा शेतमालाची खरेदी-विक्री यासाठी सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा केला जातो.

२) मध्यम मुदत कर्ज पुरवठयासाठी तरतूद -

भारतीय रिझर्व बँक कायद्याच्या सेक्शन ४६-अ (२)(ब) आणि १७ (४-अ) खाली रिझर्व बँक राज्य सहकारी बँकांना मध्यम मुदत कर्ज पुरवठा करते. १५ महिने ते ५ वर्षे मुदतीसाठी मध्यम मुदत कर्ज पुरविले जाते.

३) दीर्घ मुदत कर्जाबाबत तरतूद -

भारतीय रिझर्व बँक कायद्यातील सेक्शन १७ (४-अ) आणि ४६ अ २(अ) - ४६-अ(क) आणि ४६-अ २(८) खाली रिझर्व बँक दीर्घ मुदती कर्जासाठी पतपुरवठा करते.

दीर्घ मुदत कर्जाच्या भांडवल उभारणीसाठी राज्य सहकारी भूविकास बँकांनी विक्रीस काढलेले कर्ज रोखे ही रिझर्व बँक ऑफ इंडिया खरेदी करते. असे कर्ज राष्ट्रीय शेती पतपुरवठा (दीर्घ मुदती व्यवहार) निधीमधून पुरविले जाते. सध्या हे कर्ज नाबार्डकडून पुरविले जाते.

१९५१ ते १९५३ च्या दरम्यान रिझर्व बँकेच्या कायद्यात बदल करून राज्य सहकारी बँकांना अनुसूचीत बँकाचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे योग्य व्यापारी व्यवहारासाठी हुंडी व्यवहार करणे राज्य सहकारी बँकांना शक्य झाले. बँकांच्या स्वत:च्या निधी इतक्या मर्यादेपर्यंन्त कर्ज देता येते. परंतु अशी कर्जे ५ कोटी रूपयांच्या कमाल मर्यादेत असावीत असेही बंध १९५५ मधील रिझर्व बँक कायद्यातील दुरूस्तीने दूर करण्यात आले. अशात-हेने सहकारी पतपुरवठा बाबतची बँकेची भूमिका अधिक उदार अशी आहे.[१२]

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा
पाहणी समिती :

रिझर्व बँक ऑफ इंडियाने भारतातील शेती व्यवसायाचे ग्रामीण विकासातील सहकारी चळवळीचे महत्व ओळखून सहकारी चळवळीचा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विकास योग्य रितीने व्हावा म्हणून पंचवार्षिक योजनेच्या आरंभी म्हणजे १९५१ साली डॉ. ए.डी. गोरवाला यांचे अध्यक्षतेखाली ` अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती ` ची नेमणूक केली. या समितीने आपला अहवाल १९५४ मध्ये सादर केला. ही समिती अत्यंत महत्वाची होती कारण या समितीने सादर केलेल्या शिफारशी सहकारी चळवळीच्या भाविष्यकालीन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या होत्या.

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या अहवालातील निष्कर्ष :

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने भारताच्या ग्रामीण सहकारी पतपुरवठयाचा सखोल अभ्यास करून पुढीलप्रमाणे निष्कर्ष मांडले. त्यांचे मते शेतकऱ्यांना खालील मार्गांनी पतपुरवठा होतो.

	कर्ज पुरवठा कोणाकडून होतो	एकूण कर्जाशी शे. प्रमाण
१.	सरकार	३.३
२.	सहकारी संस्था	३.१
३.	नातेवाईक	१४.२
४.	शेतकरी सावकार	२४.९
५.	सावकार	४४.८
६.	व्यापारी	५.५
७.	जमिनदार	१.५
८.	व्यापारी बँका	०.९
९.	इतर	१.८
		१००.००

CARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

या समितीने सहकारी चळवळीच्या विकासासाठी काही महत्वपूर्ण शिफारसी केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

१) राज्य सरकारने सहकारी संस्थांच्या भांडवलात भागीदारी करावी.

२) शेतक-यांना त्यांचे पीक तारण ठेवून कर्ज देण्याची सोय करावी.

३) ईंपिरिअल बँकेचे राष्ट्रीयकरण करून तिचे स्टेट बँक ऑफ ईंडियामध्ये रूपांतर करावे व त्यांनी ग्रामीण विभागात शाखा उघडून सहकारी संस्थांना मदत करावी.

४) रिझर्व बँक सहकारी संस्था व राज्य सरकार यांनी राष्ट्रीय शेती पतपुरवठा (दीर्घकालीन) परीचालन, राष्ट्रीय शेती कर्ज पुरवठा (स्थिरीकरण), राष्ट्रीय शेती कर्ज पुरवठा (मदत व तारण) इ. निधी निर्माण करावेत.

५) सहकारी संस्थांचा आकार मोठा करण्यात यावा.

६) सहकारी संस्थेचे सभासद, पदाधिकारी व सेवक वर्गास सहकारी शिक्षण द्यावे.

७) सहकारी संस्थांचे हिशोब तपासणी व देखरेख, कार्यक्षमतेने करण्यात यावी.

डॉ. ए.डी. गोरवाला समितीने सुचविलेले उपाय सरकारने स्विकारून त्याची अंमलबजावणी केली.[१३]

सहकारी पतपुरवठा समिती
(वैकुंठलाल मेहता समिती)

१९५९ मध्ये वैकुंठलाल मेहता यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी पतपुरवठयाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने सहकारी संस्थांची रचना, कार्यपध्दती याबाबत काही महत्वाच्या शिफारशी केल्या. त्या खालील प्रमाणे :

१) या समितीच्या मते ग्रामीण सहकारी संस्था अर्थक्षम असणे आवश्यक आहे. जर एका खेड्याची लोकसंख्या ३००० असेल तर स्वतंत्र सेवा सहकारी संस्था स्थापन करावी.

२) सभासदांना त्यांच्या भागाच्या मुल्याच्या ८ ते १० पट कर्ज द्यावे.

३) सहकारी संस्थेच्या अंतर्गत कारभारामध्ये सरकारने हस्तक्षेप करू नये.

४) सहकारी संस्थांच्या हिशोब तपासणीसाठी व त्यांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठी सरकारने स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी.

५) रिझर्व बँकेने राज्य सहकारी बँकांना सढळ हाताने मदत करावी.

६) कर्जदाराची परतफेडीची क्षमता पाहून कर्ज मर्यादा ठरविण्यात यावी. म्हणून कर्जदाराच्या कर्जाच्या गरजेबरोबरच सचोटी उत्पादकता, निष्ठा याचाही आधार घ्यावा.

७) मोठया शेतक-याबरोबरच अल्पभूधारक आणि कुळे यांनाही शेती सहकारी पतसंस्थेचे सभासदत्व देण्यात यावे.

८) सरकारी तगाई कर्जे सहकारी पतरचनेमार्फतच दिली जावीत.

मेहता समितीने ज्या मौलिक शिफारशी केल्या त्यामधील अनेक शिफारशी सरकारने स्विकारून अंमलबजावणी केली. सहकारी पतपुरवठयाचे धोरण देशामध्ये सर्वत्र सारखे ठेवले गेले. सहकारी पतपुरवठा धोरणात राष्ट्रीय एकसूत्रीपणा आणण्यात आला यामुळे योग्य व पुरेसा कर्जाचा प्रवाह देशातील सर्व विभागातील शेतक-याकडे चालू करता आला.[१४]

राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास
बँकेचा सहकारी पतपुरवठयात सहभाग :

राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेची कृषि पुर्नवित्त व विकास महामंडळाची कार्यं आणि रिझर्व्ह बँकेच्या ग्रामीण कर्ज योजनांची संपूर्ण जबाबदारी आहे. या बँकेमुळे सहकारी पतपुरवठयाला प्रचंड प्रेरणा मिळाली. तसेच ग्रामीण व शेती विकासाला चालना मिळाली आहे. जून १९८४-८५ ला बँकेची एकूण साधनसामग्री ५४१ कोटी रुपये इतकी होती. याच काळात हंगामी शेती कार्याच्या कर्जपुरवठयासाठी राज्य सहकारी बँकांना एकूण १२३३ कोटी रुपये चे दिले गेले. विशेष म्हणजे हे सर्व कर्ज बँक दरापेक्षा ३.०० टक्के कमी व्याज दराने दिले जाते. राष्ट्रीय शेती आणि विकास बँकेच्या धोरणातील बदल हा महत्वपूर्ण बदल होय. १९८४-८५ मध्ये पुनर्वित पुरवठयाच्या मार्गाने १२३३ विविध योजनांना १०६१ कोटी रुपये इतका कर्ज पुरवठा केला गेला. यामध्ये राज्य सहकारी भूविकास बँकांचा हिस्सा ३१४ कोटी रुपये आहे. तर राज्य सहकारी बँकांचा हिस्सा ३७ कोटी रुपये इतका आहे.[१५]

संदर्भ

१) डॉ. गो.स. कामत,
सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन, १९७९
विद्या प्रकाशन, पुणे-३०
पृ.क्र. ३२१ ते ३२४.

२) १. प्रा. ए.आर. रायखेलकर व प्रा. अशोक डांगे
सहकार : तत्वे आणि व्यवहार १९८९
मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र.११२ व ११३.

२. डॉ. गो.स. कामत
सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन १९७९
विद्या प्रकाशन, पुणे-३०
पृ.क्र. ७६ व ७७

३. बी.एन. चौबे
प्रिन्सिपल्स ॲन्ड प्रॅक्टीस ऑफ को-ऑपरेटिव्ह बँकींग इन इंडिया १९६८
आशिया पब्लिशींग हाऊस, मुंबई
पृ.क्र. २४.

३) १. प्रा.ए.आर. रायखेलकर व प्रा. अशोक डांगे
सहकार : तत्वे आणि व्यवहार १९८९
मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र. ११३ व ११४.

२. बी.एस. माथुर
को-ऑपरेशन इन इंडिया १९७७
साहित्य भवन, आग्रा
पृ.क्र. ६६ ते ६८

४) प्रा. मोहन सराफ व प्रा. आर.एस. शहा
सहकार
सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई
पृ.क्र. २७७ ते २८०.

५) प्रा. ए.आर. रायखेलकर व अशोक डांगे
सहकार : तत्वे आणि व्यवहार - १९८९
मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र. १९८ ते २१०.

६) १. ईंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्हयू, जानेवारी, १९८४
पृ.क्र. २४२.

२. प्रा. ए.आर. रायखेलकर व प्रा. अशोक डांगे
सहकार : तत्वे आणि व्यवहार - १९८९
मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र. २०६ ते २०८.

७) १. प्रा. गो.स. कामत
सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन - १९७९
विद्या प्रकाशन, पुणे-३०
पृ.क्र. १२७ ते १३०.

२. प्रा. ए.आर. रायखेलकर व प्रा.अशोक डांगे
सहकार : तत्वे आणि व्यवहार - १९८९
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र. १५२

८) १. भोसले व महाजन
सहकार तत्व आणि व्यवहार - १९८६
फडके प्रकाशन, कोल्हापूर
पृ.क्र. १६.

२. ए.आर. रायखेलकर व प्रा. अशोक डांगे
सहकार : तत्वे आणि व्यवहार - १९८९
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र. १५२.

९) सी.बी. मेमोरिया
ॲग्रिकल्चरल प्रॉब्लेम्स ऑफ ईंडिया - १९८४
किताब महल, अलहाबाद,
पृ.क्र. ४९५ ते ४९७.

१०) गो.स. कामत
सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन - १९८९
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०
पृ.क्र. १२९ ते १६६.

११) सी.बी. मेमोरिया
ॲग्रिकल्चरल प्रॉब्लेम्स ऑफ ईंडिया - १९८४
किताब महल, अलाहाबाद,
पृ.क्र. ४५६ व ४५७.

१२) गो.स. कामत
सहकार : तत्व, व्यवहार व व्यवस्थापन - १९७९
विद्या प्रकाशन, पुणे-३०
पृ.क्र. १६७ ते १७५.

१३) प्रा. मोहन सराफ व प्रा. आर.एस. शहा.
सहकार
सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई
पृ.क्र. २८ ते ३३.

१४) डब्ल्यु. सी. श्रीमाल
` को-ऑपरेटिव्ह क्रेडीट इन प्लॅनिंग इरा प्रोग्रेस, प्राब्लेम्स
ॲन्ड इम्पॅक्ट` : चिंचणकर आणि नामजोशी संपादित
` को-ऑपरेशन ॲन्ड दी डायनॉमिक्स ऑफ चेंज ` १९७७
या पुस्तकातन
सोमय्या पब्लिशिंग प्रा.लि., मुंबई
पृ.क्र. १८५

१५) आर.बी.आय.
रिपोर्ट ऑन ट्रेड ॲन्ड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया १९८४-८५
सप्लीमेंट आर.बी.आय. बुलेटीन, सप्टेंबर, १९८५
पृ.क्र. १६१ ते १६४.